माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०१०/२०१९
दि.१८/०२/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.अखिल सुरेन्द्र प्रताप सिंह व श्री.दयानंदर तोमा पालन, ................अपिलार्थी
लक्ष्मीनारायण मोरे कंपाऊड,
चामुंडा क्लासिक बिल्डींग,
पांडुरंगवाडी समोर, पेणकरपाडा,
महाजनवाडी, मिरारोड (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
विधी अधिकारी, विधी विभाग

जन माहिती अधिकारी तथा ................प्रतिवाद
प्र.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग

## -: विवेचन :-

श्री.अखिल सुरेन्द्र प्रताप सिंह व श्री.दयानंदर तोमा पालन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांचेकडे दि.३०/११/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**विषय:- मौजे महानजवाडी येथील (जुना) सर्व्हे नं.१२६ (नविन) सर्व्हे नं.५० हिस्सा नं.७ मधील वर नमुद दाव्यासंदर्भात दि.०२.०९.२०१५ रोजी जा.क्र.मनपा/साबां/५५६६/२०१५-१६ नुसार अदा करण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र व वीज मिटर ग्राहक क्र.१०४९०२१११९ च्या छाननीबाबत.**

१) वर नमुद तपशील व माहितीच्या विषयाबाबत नमुद ना हरकत दाखल्याची प्रत तसेच श्री.विनोद देवजी वाघरी व इतर यांनी सदर दाखला मिळविण्यासाठी आपले कार्यालयास केलेल्या अर्जाच्या व जोडण्यात आलेल्या सहपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळण्याबाबत.

२) सदर नमुद वीज मिटरचे बील हे १९९० सालचे असून त्यावर नमुद पत्ता हा विषयांकित जागेचा नसुन दुसऱ्याच ठिकाणचा असल्याने निदर्शनास येते. याबाबत आपले कार्यालयामार्फत नमुद पक्षकाराला कोणत्याही प्रकाराचा ना हरकत दाखला किंवा इतर कागदपत्रे अदा करण्यापूर्वी कागदपत्रांची शहानिशा करण्यात आली असल्यास किंवा कसे? सदर छाननी अहवालाच्या व संबंधित कागदपत्रांच्या व सहपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१८/०१/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग, जन माहिती अधिकारी तथा प्र.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१५/०२/२०१९ रोजी दुपारी १२.५० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.विधी/०१२/२०१९ दि.३०/०१/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी स्थायी समिती सभा आयोजित केली असल्याने सुनावणी रद्द करण्यात आली असुन प्रथम अपिलाची सुनावणी, मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी) यांचेसमोर दि.१६/०२/२०१९ रोजी दुपारी १२.५० वाजता आयोजित करण्यात आली असुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग, जन माहिती अधिकारी तथा प्र.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.विधी/१६/२०१९ दि.१४/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी अपिलार्थी अर्जदार न्यायालयीन कामकाजासाठी गेले असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी) यांचेसमोर दि.१८/०२/२०१९ रोजी दुपारी १२.१५ वाजता आयोजित करण्यात आली असुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग, जन माहिती अधिकारी तथा प्र.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.विधी/१९/२०१९ दि.१६/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग हे रजेवर असल्याने अनुपस्थित असुन सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, विधी विभाग व जनमाहिती अधिकारी तथा प्र.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दिलेले नाही.

२) **सहा.जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद**:- अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

३) **जन माहिती अधिकारी तथा प्र.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद**:- अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिलेली असुन जनमाहिती अधिकारी तथा प्र.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास आपणाकडे उपलब्ध असलेली माहिती १० दिवसांत विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी)
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

प्रति:-

१) श्री.अखिल सुरेन्द्र प्रताप सिंह व श्री.दयानंदर तोमा पालन,
लक्ष्मीनारायण मोरे कंपाऊड,
चामुंडा क्लासिक बिल्डींग,
पांडुरंगवाडी समोर, पेणकरपाडा,
महाजनवाडी, मिरारोड (पूर्व).

22/02/2017

२) जन माहिती अधिकारी तथा
विधी अधिकारी, विधी विभाग

३) जन माहिती अधिकारी तथा
प्र.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी) यांचे कार्यालय.

पोच
लिपीक
सार्वजनिक बांधकाम विभाग
मिरा-भाईंदर महानगर पालिका